


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २५४ ●शनिवार,दि.१३ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ ६८ शब्दांत गुंडाळला; सभागृहात झाला शाब्दिक वाद



## CBSE बोर्डमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास कमी शब्दांत आमदार सत्यजित तांबेंनी उपस्थित केला सवाल; राज्य सरकारकडून कारवाईची केली मागणी

**नागपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा सीबीएसई पॅटर्नमध्ये इतिहास सांगण्यावरुन वाद निर्माण झाला आहे. सीबीएसईच्या पुस्तकांमध्ये केवळ ६८ शब्दांमध्ये इतिहास मांडण्यात आल्याचा आरोप आमदार सत्यजित तांबे यांनी केला. सध्या राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. सत्यजित तांबे यांनी याबाबत विधीमंडळामध्ये मुद्दा मांडला असून आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच या संदर्भात राज्य सरकारने कडक भूमिका घेण्याची मागणी केली आहे. नागपूरमध्ये सध्या हिवाळी अधिवेशन सुरु असून यावेळी राज्यातील विविध विषयांवर चर्चा आणि भाष्य केले जात आहेत. यामध्ये आमदार सत्यजित तांबे यांनी शाळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अगदी कमी शब्दांत शिकवला जात असल्याची बाब नजरते आणून दिली आहे. सत्यजीत तांबे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास ▶ उर्वरित पान २ वर

### ● तर महाराष्ट्र शासनाने स्वतः हा इतिहास लिहून...

**पुढे ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज प्रजाहितदक्ष राजे होते, उत्तम प्रशासक होते, त्यांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्य उभारले. भारतीय उपखंडातील इतर राजे, महाराजे भव्य महाल उभारण्यात व्यस्त असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःसाठी महाल न उभारता स्वराज्य उभारले. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये, वृक्षतोड करू नये इतकी दूरदृष्टी त्यांनी आपल्या प्रशासनात पेरली. हा सगळा इतिहास ६८ शब्दांत कसा काय मांडला जाऊ शकतो ? जर CBSE ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाबद्दल पुरेशी माहिती नसेल तर महाराष्ट्र शासनाने स्वतः हा इतिहास लिहून CBSE कडे दिला पाहिजे, अशी आक्रमक भूमिका आमदार सत्यजित तांबे यांनी घेतली.**

# डिझेल टँकरचा National Highway वर स्फोट, स्फोटाचं नेमकं कारण आलं समोर!

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा घाटाजवळील कोळवाडी फाटा येथे आज (१२ डिसेंबर) दुपारच्या सुमारास एका डिझेलच्या टँकरचा भीषण अपघात झाला. पूर्ण क्षमतेने भरलेला हा टँकर उलटल्याने त्याचा स्फोट होऊन आग लागली, ज्यामुळे संपूर्ण परिसरात आगीचे प्रचंड लोट उठले. या घटनेमुळे महामार्गावर दोन्ही बाजूंनी जवळपास दोन ते अडीच किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा लागल्या असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. टँकरला कंटेनरने धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला आणि त्यामुळेच आगीचा प्रचंड भडका ▶ उर्वरित पान २ वर

# दहशत निर्माण करणाऱ्या मटकाचालकासह दोघं सराईत बीडमधून हद्दपार! जिल्हाधिकारी, एसपींची धडक कारवाई

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालून कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडून सराईत गुन्हेगारांवर कारवाईचा धडाका सुरुच आहे. अशाच एका मटका चालक आणि दहशत निर्माण करणाऱ्या दोघांवर एमपीआयडी अंतर्गत कारवाई करुन त्यांची छत्रपती संभाजीनगरच्या हर्सुल कारागृहात रवानगी करण्यात आली. पोलिसठाणे अंबाजोगाई शहर व पोलिस ठाणे तलवाडा अंतर्गत गुन्हे नोंद असलेल्या या दोन सराईत गुन्हेगारांवर एमपीआयडी अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे पाठविला होता. यानुसार गुरुवारी सदर प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर या दोघांना आज शुक्रवारी ताब्यात घेत त्यांना हर्सुल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. ▶ उर्वरित पान २ वर

# 'त्या' मंत्र्यांवर बिबट्या सोडा, सुधीर मुनगंटीवार सभागृहात प्रचंड आक्रमक, नेमकं काय घडलं?



**नागपूर । प्रतिनिधी**

विधीमंडळाचं सध्या हिवाळी अधिवेशन सुरु आहे. हिवाळी अधिवेशनाचा आज पाचवा दिवस आहे. अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी विधानसभेच्या सभागृहात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार हे प्रचंड आक्रमक झालेले बघायला मिळाले. मंत्र्यांच्या अनुपस्थितीवर सुधीर मुनगंटीवार हे आक्रमक झाले. आमदार सभागृहात उपस्थित असताना जे मंत्री उपस्थित राहणार नाहीत त्यांच्यावर बिबट्या सोडा, असं वक्तव्य ▶ उर्वरित पान २ वर

# संतोष देशमुखांच्या हत्येवेळी वाल्मिक कराड शेकडो किलोमीटर दूर! जामीन मिळणार का?

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांड प्रकरणात वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचा जोरदार युक्तिवाद सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात केला. तर या हत्याकांडात विनाकारण गोवल्याचा दावा करत कराडच्यावतीने खंडपीठात जामीन अर्ज दाखल करण्यात आला. न्या. एस. एम. घोडेस्वार यांच्यासमोर हा युक्तिवाद झाला. या प्रकरणाची उर्वरीत सुनावणी मंगळवारी (ता.१६) होणार आहे.

मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण खून प्रकरणातील मुख्य सुत्रधार वाल्मिक कराड हा गुन्हा दाखल झाल्यापासून अटकेत आहे. त्याच्यावर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत अर्थात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. हे कलम लागू ▶ उर्वरित पान २ वर

# ZP शाळांमधील बदल्यांसाठीचे सर्व GR रद्द करण्याची सरकारची तयारी

**नागपूर । प्रतिनिधी**



राज्यांतील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे, त्यांच्या बदल्या, पुरेशी पटसंख्या नसल्याने बंद पडणाऱ्या शाळा, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन असे मुद्दे सातत्याने चर्चेत असतात. त्यावरून अनेकदा शिक्षक संघटनांनी आंदोलने केली आहे. आज विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही या मुद्दयावर चर्चा झाली. या चर्चेदरम्यान ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी शिक्षकांच्या बदल्यांबाबत अत्यंत महत्वाची माहिती दिली. भाजपचे नागपुरातील आमदार मोहन मते यांनी झेडपी शाळांमधील शिक्षकांची बिंदूनामावली, बदल्या, समयोजन आणि बंद पडणाऱ्या ▶ उर्वरित पान २ वर

# मनोज जरांगे पाटलांना राजकीय पक्षाकडून आता थेट अध्यक्षपदाची ऑफर

**मुंबई । प्रतिनिधी**



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मोठा लढा उभारला, मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी त्यांनी अनेकदा उपोषण केलं, अखेर मुंबईमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनानंतर आता मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला, सरकारने राज्यात मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद गॅझेटला परवानगी दिली. राज्यात हैदराबाद गॅझेट लागू झाल्यामुळे राज्यात सध्या ओबीसी आणि मराठा संघर्ष वाढताना दिसत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको अशी भूमिका ओबीसी समाजाची आहे. दरम्यान हे सर्व सुरू असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे मनोज जरांगे पाटील यांना आता थेट राजकीय पक्षाकडून अध्यक्षपदाची ऑफर देण्यात आली आहे. स्वराज्य शक्ती सेना पक्षाच्या अध्यक्षा करुणा मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांना आता थेट ▶ उर्वरित पान २ वर

# शिवराज पाटील चाकूरकर यांचं निधन

**लातूर । प्रतिनिधी**

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं वयाच्या ९० व्या वर्षी निधन झालं आहे. लातूर येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागील काही दिवसापासून ते आजारी होते.






# शिवराज पाटील चाकूरकर: राजकारणातील स्वच्छ प्रतिमेचा अंतिम प्रवास

भारतीय राजकारणातील सौम्य, अभ्यासू आणि संसदीय परंपरा जपणारे नेता म्हणून ओळखले जाणारे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन झाले. मराठवाड्यातील चाकूर गावातून सुरू झालेला त्यांचा सामाजिक, राजकीय प्रवास दिल्लीपर्यंत पोहोचला आणि पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी राष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. जाणून घेऊयात त्यांची राजकीय कारकीर्द कशी होती? मंत्रीपदापर्यंतचा प्रवास कसा होता? याबाबतची माहिती.

● राजकीय कारकीर्द : सातत्य, सौम्यता आणि संघटनकौशल्य

12 ऑक्टोबर 1935 रोजी लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे जन्मलेले शिवराज पाटील यांनी 1960 नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. आधी विधानसभा आणि नंतर 1980 मध्ये ते पहिल्यांदा लोकसभेत निवडून आले आणि सलग सात वेळा लातूरचे प्रतिनिधित्व करत राष्ट्रीय पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली.

● मंत्रिपदांचा प्रवास : इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण राज्यमंत्री म्हणून सुरुवात

वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश, महासागर विकास अशा महत्त्वाच्या खात्यांचा कार्यभार

राजीव गांधी सरकारमध्ये कार्मिक आणि संरक्षण उत्पादन मंत्री

नागरी विमान वाहतूक आणि पर्यटन विभागाचा स्वतंत्र कार्यभार

पाटील यांची संयमी वृत्ती, संसदीय नियमांची जाण आणि शिस्तप्रियता यामुळे ते इंदिराजी व काँग्रेस पक्षातील विश्वासू चेहरा मानले जात.

● लोकसभा अध्यक्ष म्हणून अधोरेखित कामगिरी (1991–1996), लोकसभा कामकाजाचे आधुनिकीकरण, प्रश्नोत्तराच्या तासाचे थेट प्रक्षेपण सुरु

संसद ग्रंथालयाचे नव्या इमारतीत स्थलांतर

माहिती प्रसारण आणि सदस्यांसाठी संसदीय साहित्य उपलब्धतेत सुधारणा

त्यांच्या काळात लोकसभेचे कामकाज अधिक पारदर्शक आणि



**भारतीय राजकारणातील सौम्य, अभ्यासू आणि संसदीय परंपरा जपणारे नेता म्हणून ओळखले जाणारे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन झाले.**

जनसुलभ करण्यासाठी ते ओळखले गेले.

● गृहमंत्री पदावरील कार्यकाळ (2004–2008)

2004 मध्ये निवडणूक पराभूत होऊनही त्यांच्यावर पक्षाने ठेवलेल्या विश्वासामुळे त्यांना केंद्रीय गृहमंत्रिपद देण्यात आले. हे त्यांच्या राजकीय वजनाचे प्रतीक मानले गेले. गांधी घराण्याची असलेली त्यांची निष्ठा कायमच चर्चेचा विषय ठरली.

● वादाचे विषय : झालेल्या टीका आणि कठीण निर्णय

● मुंबई 26/11 हल्ल्यांनंतरचा राजीनामा

2008 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यांनंतर सुरक्षेतील त्रुटींवर देशभर टीका झाली. या हल्ल्यांची नैतिक जबाबदारी स्वीकारत शिवराज पाटील चाकूरकर यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा राजकीय धक्का मानला जातो.

नंदीग्राम प्रकरणातील टीका : पश्चिम बंगाल सरकारच्या विनंतीनंतरही नंदीग्राममध्ये केंद्रीय दल वेळेवर न पाठवल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. त्यानंतर झालेल्या हिंसाचारामुळे या निर्णयावर मोठा वाद निर्माण झाला.

● मालेगाव बॉम्बस्फोट (2006) : मालेगाव स्फोटांमध्ये गोंधळलेले तपास, विविध एजन्सींमधील मतभेद यामुळे गृहमंत्रालयाच्या निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

● अमेरिकेच्या राजनैतिक केबलमधील टीका : अमेरिकेचे राजदूत डेव्हिड मुलफोर्ड यांनी 26/11 नंतर पाटील यांना "अयोग्य" ठरवत हकालपट्टी अपरिहार्य असल्याचे लिहिल्याचा खुलासा 'विकिलीक्स'मधून झाला. यामुळे त्यांच्या प्रतिमेवर आणखी वादाचा रंग चढला.

● उत्तरार्धातील राजकीय जीवन : 2008 नंतर काही काळ शांततेत राहिल्यानंतर 2010 मध्ये त्यांची पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगड प्रशासक म्हणून नियुक्ती झाली. काही काळ त्यांनी राजस्थानाचे प्रभारी राज्यपाल म्हणूनही कारभार पाहिला. पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगड प्रशासक म्हणून 2015 पर्यंत त्यांनी ही जबाबदारी अतिशय सन्मानाने पार पाडली. भाजपाची सत्ता असतानाही त्यांना राज्यपाल पदावर कायम ठेवण्यात आलं होतं.

● शिस्तप्रिय नेता, सौम्य व्यक्तिमत्त्व : शिवराज पाटील हे शांत, संयमी आणि संसदीय परंपरांचे काटेकोर पालन करणारे म्हणून नेहमी लक्षात राहतील. सत्य साईबाबा यांचे ते निष्ठावंत अनुयायी होते. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि शांत शैली हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते. गीतेचे त्यांनी इंग्रजी मध्ये भाषांतर केले होते.

शिवराज पाटील यांचे निधन म्हणजे मराठवाड्यातील आणि राष्ट्रीय राजकारणातील एका संपूर्ण युगाचा अंत. प्रशासन, संसद, मंत्रालय आणि राज्यपालपद या सर्व पातळ्यांवर त्यांनी दिलेली सेवा दीर्घकाळ स्मरणात राहील. शिवराज पाटील चाकूरकर यांची राजकीय कारकीर्द अनेक उतार-चढावांनी भरलेली असली, तरी सार्वजनिक जीवनातील त्यांचा मोठा वाटा आणि दिलेला दीर्घकालीन योगदान नेहमी आदराने स्मरणात राहील.

### ● ती एक चूक भोवली...नाहीतर मराठी माणूस देशाच्या पंतप्रधान पदी, शिवराज पाटील चाकुरकर यांच्या अनेक आठवणी ताज्या

राजकारणात समाजवादी, उजवे, डावे, शेतकरी-कामगार वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे अनेक पक्ष आणि नेते होते. पण सुसंस्कृतपणा आणि शालीनता हे या राजकारण्यांचा मुख्य स्वभाग गुण होता. शिवराज पाटील चाकुरकर हे या पिढीतील नेते होते. त्यांच्या निधनामुळे त्यांचे चाहते, कार्यकर्त्यांना अनेक गोष्टींची यानिमित्ताने आठवण होत आहे. त्यांच्या राजबिंड व्यक्तिमत्वाला या शालिनतेचा साज होता. पण मुंबईतील 26/11 दहशतवादी हल्ला झाला. त्यावेळी एक चूक त्यांना महागात पडली आणि ते झटदिशी राजकारणाच्या मुख्य प्रवाहातून बाजूला फेकले गेले. 26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबईवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. मुंबईत तीन दिवस दहशतवाद्यांचा हैदोस सुरू होता. त्यावेळी शिवराज पाटील हे केंद्रीय गृहमंत्री होते. त्यावेळी पाटील यांच्यावर हल्ला झालेला असतानाही हे सारखे कपडे बदलत असल्याचा आरोप झाला. त्यांनी दिवसभरात किती वेळा ड्रेस बदलला. ते सीरीयल ड्रेस चेंजर असल्याची टीका त्यावेळी झाली. त्यांना विरोधकांनी निरो म्हटले. रोम जळत असताना निरो हा बासरी वाजवत बसल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. त्यानंतर त्यांना पदावरून पाय उतार व्हावे लागले आणि ही एक चूक त्यांना राजकारणात महाग पडली. ते पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून ओळखले जात होते. .

◆ पान ९ वरून पुढे...

## छत्रपती शिवाजी....

CBSE च्या इयत्ता पहिली ते बारावीच्या अभ्यासक्रमात केवळ ६८ शब्दांत गुंडाळण्यात आला आहे. याबाबत मी मागील अधिवेशनात दिनांक १८ जुलै २०२५ रोजी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळ मंत्री महोदयांनी आपण दिल्लीत जाऊन याचा पाठपुरावा करू असा शब्द दिला होता, मात्र अजूनही याबाबत काहीही कार्यवाही झाली नाही, असा मुद्दा तांबे यांनी सभागृहात मांडला. छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास देशाच्या भावी पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे! छत्रपती शिवाजी महाराजांनी भारताच्या इतिहासाला व भूगोलाला आकार दिला. जगाच्या पटलावर उदयास आलेल्या, संपूर्ण महाराष्ट्राचा स्वाभिमान असलेल्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनावर बिंबवला पाहिजे, अशी भूमिका सत्यजित तांबे यांनी घेतली. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक आणि गडकिल्ल्यांबाबतही सत्यजित तांबे यांनी पाठपुरावा करण्याची मागणी केली. ते म्हणाले की, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा सरकारने केली होती, स्वतः पंतप्रधानांच्या हस्ते याचा भव्य सोहळाही करण्यात आला, मात्र त्यानंतर या स्मारकाच्या बाबतीत काहीही प्रगती झाली नाही. संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याबाबतही अशीच अक्षम्य दिरंगाई झाली, जिल्हा नियोजन निधीतून हे काम शक्य असताना विनाकारण नगर विकास विभागाकडे हा विषय गेला. जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयजयकार होत असताना, त्यांची जन्मभूमी असलेल्या महाराष्ट्राचे हे उदासीन धोरण दुर्दैवी आहे. अशा शब्दांत आमदार सत्यजित तांबे यांनी नाराजी व्यक्त केली.

## डिझेल टँकरचा....

झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, टँकर उलटताच त्यातून डिझेल गळू लागले आणि काही क्षणातच स्फोट होऊन आग भडकली. आगीने इतके रौद्ररूप धारण केले की, लगतच्या गायरान जमिनीवरील झाडे आणि वनस्पतींनाही या आगीचा फटका बसला आहे. परिसरातील हिरवीगार जागा आगीच्या भक्ष्यस्थानी पडली असून, धुराचे लोट आकाशात पसरले आहेत. ही घटना बीड लगतच्या पाली गावाजवळील कोळवाडी फाटा येथे घडली. मांजरसुंबा घाट हा डोंगराळ आणि वळणावळणाचा भाग असल्याने, येथे अपघाताची शक्यता नेहमीच असते. अपघातानंतर तात्काळ वाहतूक शाखेचे पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दोन्ही बाजूच्या वाहनांना थांबवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, ज्यामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. मात्र, आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला घटनास्थळी पोहोचण्यास उशीर लागला, ज्यामुळे आगीला आणखी फैलावण्याची संधी मिळाली. डिझेलमुळे आग आटोक्यात आणण्यात मोठी अडचण येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. डिझेलचा टँकर पूर्ण भरलेला असल्याने आग भडकण्यास वेळ लागला नाही. आम्ही प्रयत्न करत आहोत, पण डिझेलच्या गळतीमुळे आग नियंत्रणात आणणे कठीण जात आहे, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल होऊन आग विझवण्याचे प्रयत्न करत आहेत, मात्र डिझेलच्या स्वभावामुळे ही प्रक्रिया वेळखाऊ ठरत आहे. या अपघातामुळे धुळे–सोलापूर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये घबराट पसरली असून, काहींनी घटनास्थळापासून दूर राहण्यासाठी पर्यायी मार्ग शोधण्यास सुरुवात केली आहे. बीड पोलिसांनी या घटनेची चौकशी सुरू केली असून, टँकरच्या मालकाची माहिती घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अपघाताचे कारण स्पष्ट झाल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले. परिसरातील रहिवाशांनी सांगितले की, या घाटात अपघाताच्या घटना वारंवार घडतात, मात्र आजच्या घटनेने सर्वांना धक्का बसला आहे. आग इतकी भीषण होती की, दूरवरूनही धूर दिसत होता. आम्ही घाबरून गेलो, असे एका स्थानिक शेतकऱ्याने सांगितले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे, मात्र चालक आणि क्लिनर यांचा शोध घेण्यात येत आहे. बीड जिल्हा प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून, महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच, भविष्यात अशा अपघात टाळण्यासाठी घाटातील रस्त्यांची दुरुस्ती आणि सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे. अधिक माहिती मिळताच अद्ययावत बातमी देण्यात येईल.

## दहशत निर्माण....

अंबाजोगाईतील गोविंद धर्मराज काळे (वय ४०) याच्याविरुद्ध मटका खेळणे तसेच खेळवणे, जुगार अड्डा चालविणे, शिवीगाळ व धमक्या देणे अशा गुन्ह्यांची(उीळाश)नोंद आहे. या आरोपीवर प्रतिबंधक कारवाई झाल्यानंतरही त्याचया वर्तनात सुधारण झाली नाही. तर गोवर्धन सिद्धेश्वर येळजाब (वय २९, रा. रोहितळ, ता. गेवराई) याच्याविरुद्ध महिलांना पळवून नेणे, बलात्कार, दंगल, गंभीर दुखापत, धमक्या तसेच अवैध दारू विक्री अशा स्वरूपाचे चार गंभीर गुन्हे नोंद आहेत. याच्यावरही पूर्वी प्रतिबंधक कारवाई करूनही त्याची गुन्हेगारी वाढतच गेली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज निलंगेकर, पोलिस निरीक्षक शरद जोगदंड आणि त्यांच्या पथकांनी गोपनीय माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले व त्याच दिवशी हर्सूल कारागृहात स्थानबद्ध केले. अवैध वाळू वाहतूक व उपसा, मटका, गुटखा तसेच जातीय – धार्मिक तेढ निर्माण करणारे आणि दादागिरी व खंडणीखोरी करणाऱ्या गुंडांवर एमपीडीएए, मकोकासारख्या कडक कारवाया सुरुच राहतील. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेसाठी पोलिस दल कटीबद्ध असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी म्हटले आहे.

## 'त्या' मंत्र्यांवर...

सुधीर मुनगंटीवार यांनी केलं. घरकुल योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना निधी मिळत नसल्याने सुधीर मुनगंटीवार सभागृहात प्रचंड संतापलेले बघायला मिळाले. सभागृहात यावेळी नेमकं काय-काय घडलं, ते आपण जाणून घेऊयात. तालिका अध्यक्ष समीर कुणावार यांनी अर्धा तास चर्चा क्रमांक ११. सुधीर मुनगंटीवार आहेत का?, असा प्रश्न केला. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी हो, आहे. इकडेच आहे. अहो माझी साईजही मोठी आहे. दिसलो पाहिजे, असं म्हणाले. यानंतर तालिका अध्यक्षांनी पण मंत्री महोदय आहेत का? असा प्रतिप्रश्न केला. त्यावर सुधीर मुनगंटीवार भडकले. मंत्री महोदय आणण्याची जबाबदारी आमची नाही. ती तुमची आहे. आम्ही आपले उपस्थित आहोत. आता सभागृहात आमदार उपस्थित असताना मंत्री उपस्थित नसल्यावर त्यांच्यावर बिबट्या सोडा. हे धंदे आता बंद करा, अशा शब्दांत सुधीर मुनगंटीवार यांनी तालिका अध्यक्षांना सुनावलं. यावेळी तालिका अध्यक्षांना अधिकाऱ्यांनी मंत्री सभागृहात उपस्थित असल्याची माहिती दिली. त्यावर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आपल्याला का सांगितलं नाही, सांगितलं असतं तर आपण कशाला असा प्रश्न केला असता, असं बोलताना बघायला मिळाले. यानंतर सुधीर मुनगंटीवार हे आपला प्रश्न मांडतात.

## संतोष देशमुखांच्या....

असताना आरोपीला सहजासहजी जामीन मिळत नाही. पण तरीही वाल्मिकच्या जामिनासाठी त्यानं खंडपीठात धाव घेतली आहे. वाल्मिकच्या वकिलांनी युक्तीवाद करताना म्हटलं की, वाल्मिक कराडल अटक करताना लेखी माहिती किंवा नोटीस दिली नाही. याचा संदर्भ देताना सर्वोच्च न्यायालयाच्या मिहीर शहा विरुद्ध राज्य सरकार यांसह विविध निवड्यांचा यावेळी हवाला देण्यात आला.

वाल्मिक कराडला लावलेला मकोका चुकीच्या पद्धतीने लावला. वाल्मिक कराड याचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली तेंव्हा कराड शेकडो किलोमीटर दूर होता. या प्रकरणात कराडला खोट्या पद्धतीने गोवण्यात आल्याच्या मुद्याही यावेळी त्याच्या वकिलांनी मांडला. या जामीन अर्जावर शुक्रवार (ता. १२) सकाळी साडेअकरा वाजता सुनावणी सुरु झाली. यावेळी मुख्य सरकारी वकील अमरजितसिंग गिरासे यांनी सायंकाळपर्यंत सलग सहा ते सात तास युक्तीवाद केला. गिरासे यांनी वाल्मिक कराडचे खून प्रकरणाशी थेट कसा संबध आहे? याचे अनेक पुरावे आणि प्रत्येक तारखेनुसार घटनाक्रम तपशीलवार उलगडून दाखवला. या घटनेतील साक्षीदार, सीडीआर अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, ऑडिओ रेकॉर्डींग, न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल न्यायालयात दाखविण्यात आला.

या सगळ्या पुराव्यांवरुन वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचा युक्तिवाद गिरासे यांनी केला. कराडने अवादा कंपनीला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नकार दिल्यामुळे कराडने सुदर्शन घुले याला कंपनीला बंद करण्यासाठी पाठवले होते. घुलेने कंपनीच्या पहारेकऱ्याला जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण केली. अधिकाऱ्यांना खंडणीसाठी जीवे मारण्याच्या धमक्या देत कंपनी बंद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बीड जिल्ह्यातील अतिशय मागास भागातील कंपनी बंद होऊ नये आणि येथील तरुणांचा रोजगार जाऊ नये, अशी विनंती सरपंच संतोष देशमुख यांनी केली होती. तसेच पोलिसात तक्रार दिली होती. त्यावर सुदर्शन घुलेने देशमुख यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणानंतर कराड याने आपल्या मागणीच्या आड येणाऱ्या देशमुखला आडवा करा, असा आदेश दिला. त्यानुसार सुदर्शन घुले आणि त्याच्या सहकाऱ्यांनी उमरी टोलनाक्यावरुन संतोष देशमुख यांचे अपहरण केले. त्यांना निर्जन जागी नेऊन मानवतेला काळीमा फासणारे कृत करत मारहाण केली. ही मारहाण सुरू असताना वाल्मिक कराड, विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यात फोनवर बोलणे सुरू होते. कराड हाच मारेकऱ्यांना निर्देश देत होता, अशी बाजू गिरासे यांनी मांडली.

## ZP शाळांमधील....

शाळांबाबतचा मुद्दा मांडला. त्यावर गोरे यांनी ऑक्टोबर अखेरपर्यंत सुमारे ६६ हजार शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सांगितले. तसेच पटसंख्या कमी असल्याने एकही शाळा बंद पडणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बिंदूनामावलीची प्रक्रियाही पूर्ण झाली असून त्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षात जून महिन्याच्या आधी बदल्यांची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असेही गोरे यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या या उत्तरानंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी गोरेंवर निशाणा साधला. मंत्र्यांचे उत्तर गोलमोल असल्याचा निशाणा त्यांनी साधला. आज शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले आहे. ग्रामीण भागातील मुलांच्या आयुष्याशी तुम्ही खेळत आहात का, नवीन धोरणे आणत असताना जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करायच्या, हा तुमचा निर्णय झालाय का, असा सवाल वडेट्टीवारांनी केला. हा खेळखंडोबा सुरू आहे.

## मनोज जरांगे....

आपल्या पक्षाच्या अध्यक्षपदाची ऑफर दिली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी मी मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन दिलं होतं. तुमच्यासारख्या चांगल्या व्यक्तिमत्त्वाची सर्व समाजाच्या घटकांना गरज असल्याचं देखील मी त्यांना म्हटलं होतं. महाराष्ट्राच्या १८ पगड जातीला तुमची गरज आहे, अशी माझी त्यांना विनंती असून स्वराज्य शक्ती सेनेचे अध्यक्षपद द्यायला मी त्यांना तयार आहे, असं यावेळी करुणा मुंडे यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, धनंजय मुंडे नव्हे तर मी गोपीनाथ मुंडे यांचा राजकीय वारसा घेऊन पुढे जात आहे, तो माझ्याकडे आहे. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे काय करतायेत हे तुम्ही सर्व बघत आहात. गोपीनाथ मुंडे यांनी ज्या पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्र सायकलवर फिरून संघर्ष केला, त्याच पद्धतीने मी एकटी महिला असून देखील महाराष्ट्र फिरते आहे. वाल्मीक कराड प्रकरणामध्ये आमच्या पूर्ण घराण्याची आणि आमच्या कुळाची बदनामी झाली आहे. असंही यावेळी करुणा मुंडे यांनी म्हटलं आहे. तसेच त्यांनी यावेळी भाजपावर देखील जोरदार टीका केली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## स्वाभिमानी शेतकरी...

अधिकाऱ्यांनी तलवाडा याठिकाणी तत्काळ रस्त्याचे काम सुरू केले असून शिवाजी महाराज चौक ते गंगावाडी फाटा रस्त्याचे काम सुरू केले असून हे काम शासनाच्या नियम व अटी नुसार गुत्तेदार यांच्या कडून करवून घेण्यात येईल असे लेखी आश्वासन या विभागाचे अभियंता यांनी तलवाडा या ठिकाणी येऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांना दिले असल्याने शनिवारी होणारा रस्ता रोको सध्या स्थगित करण्यात आला असल्याचे शेख खिजर यांनी सांगितले.काम सुरू झाल्याने युवा दर्पण,दैनिक लोकाशा आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सर्व जनतेमधून अभिनंदन करण्यात येत आहे.

## वडवणीकरांचे रेल्वेचे...

रेल्वे ३१.७३५ किलोमिटर अंतर पार करून सकाळी १० : ३९ ला वडवणी स्थानकावर पोचली. रेल्वेचा ताशी वेग १३२ किलोमिटर होता. आठ डबे असलेले हायस्पीड रेल्वे येताच वडवणीकरांनी जल्लोषात स्वागत केले. रेल्वे फुलांनी सजवण्यात आली.

अधिकाऱ्यांकडून निरीक्षण– रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा, मुख्य प्रशासकीय अधिकारी अविनाश कुमार पांडे, राजेश कुमार वर्मा, बी. के. सिंह, विनीत कुमार, मुख्य अभियंता मिश्रा, सुरक्षा उप आयुक्त प्रसन्न करिया, डी. डी. लोळगे आदी अधिकाऱ्यांनी रेल्वे चाचणीचे निरीक्षण केले. असे टप्पे केले पूर्ण– रेल्वेने नऊ मोठे पुल, १० ओव्हर ब्रिज, २३ अंडर ब्रिज, ३० लहान पुल, १२.५३२ मीटर उंचीचा बांध आणि २८.०४९ मिटर खोलीची कटींग पुर्ण करुन वडवणी गाठले.

## लोकनेते स्व. ..

समाजहिताचे पवित्र कार्य ठरणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजप बीड जिल्हा अध्यक्ष मा. शंकररावजी देशमुख असणार आहेत, तर उद्घाटन मा. डॉ. योगेश भैया क्षीरसागर आणि मा. सर्जेराव तात्या तांदळे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला मा. नवनाथ अण्णा शिरोळे, मा. डॉ. आदित्य सारडा, मा. अशोक शेठ लोढा आणि मा. सारिका ताई क्षीरसागर यांसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या रक्तदान शिबिराचे आयोजन गणेश लांडे, जिल्हा सरचिटणीस भाजपा बीड आणि भाजपा बीड जिल्हा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून, समाजातील नागरिक, कार्यकर्ते व युवा वर्गांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ऊसाला विनाकपात...

भीमाशंकर कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी श्री.धनंजय मुळे, कैलास काका मुळे, भारत मुळे ,विशाल हागारे सह शेकडो शेतकऱ्यांनी एकत्र येत शेतकी अधिकारी श्री. कुलकर्णी साहेब यांना मागण्यांचे निवेदन सादर केले .येत्या २५ डिसेंबर पर्यंत ऊस दराचा तिढा सोडवावा अन्यथा भीमाशंकर साखर कारखान्याचे गाळप, ऊस तोडणी ,वाहतूक बंद करण्याच्या आंदोलनाचा आक्रमक इशारा देण्यात आला.

## कड्याच्या बंधाऱ्याकडे...

तीन महिने होत आलेत तरीही आजपर्यंत बंधाऱ्यावरील वाट सुध्दा चालू केली नाही. तर दुरूस्तीचे काम कधी करतील ? हि वाट बंद असल्याने शेतकऱ्या सह नागरीकांचे हाल होत आहेत. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी व सुंदरनगर (झोपडपट्टी)कडील नागरीकांना ये-जा करण्यासाठी मोठा वळसा घ्यावा लागत आहे. तीन महिने झाले वाट बंद असून अधिकारी पाहणीसुध्दा करत नाहीत अशी प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने दिली. हा बंधारा खराब अवस्थेत असल्याने प्रत्येक दरवाज्यातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होते त्यामुळे पाणी साठून राहत नाही. आणि वाट हि बंद असल्याने या बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करून वाट सुरू करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधितांकडून आजपर्यंत कसलीच दखल घेतली नसल्याने नागरिकांनी हा बंधारा लवकरात लवकर दुरूस्तीचे काम सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## श्री नाथांच्या नगरात...

समाजसेवेचे कार्य करत स्वतःला समाज सेवेमध्ये सातत्याने व्यस्त ठेवणारे व गोरगरिबाच्या मदतीला सातत्याने धावून येणारे असे मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या उत्कृष्ट समाजसेवेच्या कार्याची दखल घेत श्री शांती ब्रम्ह श्री एकनाथ महाराज यांचे चौदावे वंशज श्री योगीराज महाराज गोसावी यांनी दखल घेऊन मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांचा श्री शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांच्या प्रतिष्ठानच्या वतीने मोठा धुमधडाक्यात शाल व श्री जनार्दन स्वामी व श्री संत श्री भानुदास महाराज व श्री संत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज श्री विजय पांडुरंग यांची दिव्य प्रतिमा अण्णांना देऊन अण्णांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला व त्यांच्या हातून होणाऱ्या पुढील समाज सेवेसाठी श्री शांती ब्रह्म एकनाथ महाराजांच्या प्रतिष्ठानच्यावतीने श्री योगीराज महाराजांनी भरभरून आशीर्वाद दिला तसेच लोकशाही पत्रकार संघाचे लोकप्रिय संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांचा देखील यथोचित सत्कार करून त्यांना देखील महाराजांनी आशीर्वाद दिला तसेच बीडचे माजी नगरसेवक बाबुराव परळकर यांना देखील महाराजांनी श्रीनाथ प्रतिष्ठानच्या वतीने श्री योगीराज महाराज यांनी आशीर्वाद दिला तसेच लोकशाही पत्रकार संघाचे मार्गदर्शक मा अनिल कचरे साहेब यांना देखील प्रतिष्ठानच्यावतीने श्री संतांची प्रतिमा देऊन महाराजांच्या वतीने आशीर्वाद देण्यात आला बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांना देखील श्री जनार्दन स्वामी श्री भानुदास महाराज व शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांची दिव्य प्रतिमा देऊन शांती ब्रम्ह एकनाथ महाराज यांच्या प्रतिष्ठानच्या वतीने वेदशास्त्र संपन्न योगीराज महाराज गोसावी यांनी शुभ मंगलमय आशीर्वाद दिला या वेळी महाराष्ट्रातील शेकडो भाविक भक्त श्री क्षेत्र प्रतिष्ठान नगरी पैठण येथे या होत असलेल्या २७ महा कुंडी यज्ञाच्या निमित्ताने उपस्थित आहेत अतिशय श्रीहरी विष्णूच्या नामस्मरणाने पवित्र वेद मंत्राच्या जयघोषाने श्रीक्षेत्र पैठण नगरी दुमदुमून गेली आहे व सर्वत्र मंगलमय आनंदमय व भक्तिमय पवित्र वातावरण सध्या श्रीक्षेत्र पैठण येथे निर्माण झाले आहे तरी सर्व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्व भाविक भक्तांनी महा यज्ञाच्या दर्शनाचा व श्री शांती ब्रम्ह एकनाथ महाराज श्री गंगा माता यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान देखील श्री वेदशास्त्र संपन्न एकनाथ महाराजांचे चौदावे वंशज श्री योगीराज महाराज यांनी श्री शांती ब्रम्ह एकनाथ महाराज यांच्या प्रतिष्ठानच्यावतीने सर्व भाविक भक्तांना आव्हान केले आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# वक्तृत्व कला अंगी आल्यास हसत खेळत आयुष्य जगणे शक्य

## भाशिप्र परिवार मुंदडा कुटुंबियांच्या जडणघडणीत नेहमीच आशिर्वादाच्या भुमिकेत: युवा नेते अक्षय मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

क्षेत्र कोणतेही असो वक्तृत्व कला अंगी जर असेल तर हसत खेळत आयुष्य जगण्यासाठी उपयुक्तता वाढते, त्यातुन सकारात्मकता साध्य होते. आयुष्याच्या व्यवस्थापनात देखील वेळेचे नियोजन महत्वाचे असते. हे सांगताना भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा परिवार नेहमीच मुंदडा कुटुंबियांच्या राजकिय जडणघडणीचा भाग राहिला असुन ही संस्था म्हणजे माझ्यासाठी हक्काचे व्यासपीठ



असल्याचे प्रतिपादन भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी केले.

खोलेश्वर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या आंतरराज्यीय स्व.नाना पालकर वक्तृत्व स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणुन ते बोलत होते. व्यासपीठावर डॉ. सुभाष जोशी, कार्यवाह हेमंत वैद्य, जिल्हा संघचालक जयप्रकाश तोष्णीवाल, चंद्रकांत मुळे, डॉ.अतुल देशपांडे, किरण कोदरकर, राम कुलकर्णी, विष्णुपंत कुलकर्णी, प्राचार्य डॉ. दीपक फुलारी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आपल्या भाषणात बोलताना अक्षय मुंदडांनी मागच्या पंचावन्न वर्षापासून सुरू असलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेचे कौतुक करताना वर्तमान स्थितीत व्याख्यानमालेकडे दुर्लक्षित झाले असताना संस्था स्पर्धेचे सातत्य टिकवुन ठेवते हे संस्कार खर्या अर्थाने नियोजनाचा आणि संस्काराचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले. मुळात भारतीय शिक्षण प्रसारक संस्था हीच खर्या अर्थाने एक चांगला नागरिक घडवणारी संस्था म्हणुन ओळखल्या जाते. मुंदडा कुटुंबाचं संस्थेसोबत पारिवारिक नातं असुन आमच्या एकुण राजकिय जडणघडणीत संस्था परिवाराचा मिळालेला आशिर्वाद कधीच विसरू शकत नाही. आमच्यासाठी हक्काचं व्यासपीठ ज्यामुळे सुचना मिळाल्याबरोबर आम्ही उपस्थित रहातो. त्याच ऋणानुबंधातुन आ.नमिता मुंदडा यांनी स्वत: पुढाकार घेत जिल्हा नियोजन विकास निधीतुन महाविद्यालय मैदान दुरूस्तीसाठी सात लाख रूपये मिळवुन दिल्याचे त्यांनी जाहिर केले. शालेय तथा महाविद्यालयीन शिक्षण घेताना मुला-मुलींनी वेगवेगळ्या स्पर्धेत सतत सहभाग घेतला तर आत्मविश्वास वाढतो. शिवाय व्यक्तिमत्व घडवण्यासाठी संधी प्राप्त होते. ज्यांना विचाराची मांडणी आणि आयुष्य कसं सुटसुटीत जगावं ? या गोष्टी स्पर्धेतुन मिळणार्या विषयातुनच पुढे येतात असं मुंदडा म्हणाले. राज्यभरातुन आलेल्या स्पर्धकासाठी अनेक वर्षापासुन जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या पुढाकाराने व्यवस्था उभा रहाते. तो केवळ संस्था परिवाराशी असलेल्या अतुट नात्याचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले. अक्षय मुंदडा यांनी आपल्या भाषणात स्व.प्रमोद महाजन, स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या आठवणी काढत उजाळा देण्याचा प्रयत्न करताना परिवार आणि मुंदडा कुटुंब हा सगळा ऋणानुबंध सांगितला. स्पर्धकांना प्रेरणा देताना त्यांनी सांगितले की, कुठल्याही स्पर्धेत भाग घेतल्यानंतर यश-अपयश याची वजाबाकी करण्यापेक्षा चिकाटीने तुम्ही घेतलेला सहभाग हेच खरं १०० टक्के यश असतं ज्यामुळे आपलं आयुष्य घडून जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन प्रा.डॉ.सतिश हिवरेकर यांनी केले.

# चिंचगव्हाणमध्ये जलजीवन मिशनचे बोगस काम उघड!

## बीड जिल्हा प्रभारी ॲड. अमोल डोंगरे यांची चौकशीची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचगव्हाण ग्रामपंचायतीत सुरू असलेल्या जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता व बोगस पद्धतीने काम केले जात असल्याचा गंभीर आरोप बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हा प्रभारी ॲड. अमोल विलासराव डोंगरे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकारी, गटविकास कार्यालय माजलगाव यांना लिखित निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली.ॲड. अमोल डोंगरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, चिंचगव्हाण ग्रामपंचायतीत सुरू असलेले जलजीवन मिशनचे काम मंजूर अंदाजपत्रकानुसार न होता निकृष्ट दर्जाचे, बोगस आणि नियमबाह्य प्रकारे करण्यात येत आहे. या कामावर योग्य देखरेख



नसल्याने सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की, हे काम तात्काळ स्थगित करून स्वतंत्र चौकशी नेमावी. झालेल्या बोगस कामाची तपासणी करून ते पुन्हा मंजूर निकषांनुसार करण्यात यावे. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. अन्यथा गटविकास कार्यालयासमोर जाहीर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ॲड. अमोल डोंगरे यांनी दिला आहे.



*दि.१२.१२.२०२५ रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ पांडुरंग मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी हरित महाराष्ट्र सुंदर महाराष्ट मोहीम राबवली. गाव पिंपळनेर ता. जि. बीड येथे अभियान पार पडले. यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव तेजस पवार,रोहन डोळस, तेजस्विनी पवार सदस्य व ग्रामस्थ होते.*

# सशक्त महिला निरोगी समाज : प्राचार्य डॉ. संध्या आयसकर

**बीड । प्रतिनिधी**

महिलांचे आरोग्य हे संपुर्ण कुटूंबासाठी आधार असतो. निरोगी महिला हे प्रगत भारताचे लक्षण असून संपुर्ण समाज सशक्त व निरोगी समाज बनवायचा असेल तर महिलांचे आरोग्य आहार यावर संपुर्णपणे लक्ष देणे आवश्यक असून समाजाचा सर्वांगीन विकास करण्यासाठी महिलांच्या संपुर्ण विकासाकडे काळजीपुर्वक लक्ष देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संध्या आयसकर यांनी सौ. के.एस.के.




महाविद्यालयातील महिला कक्ष व अंतर्गत तक्रार निवार समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली महिला कक्ष अंतर्गत तक्रार निवारण समिती सशक्त महिला व निरोगी समाज या विषयावर व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ. खान ए.एस., उपप्राचार्य डॉ. काकडे एन.आर., पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर उपस्थित होते. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. ज्योती क्षीरसागर, सुत्रसंचालन प्रा.डॉ. पल्लवी इरलापल्ले तर आभार प्रा. डॉ. दुष्यंता रामटेके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संध्या जोगदंड, डॉ. जाधव मॅडम, डॉ. अनिता वैद्य, प्रा. पटेल मॅडम यांनी परिश्रम घेतले. याकार्यक्रमसाठी महाविद्यालयातील प्राध्यापिका, विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# यहाँ के हम सिंकदर; बीड मध्ये रंगणार विशेष मुलांचा कला महोत्सव; बालरंगभुमी परिषदेचा उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलमताई शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून विशेष (दिव्यांग) मुलांचा कला महोत्सवाचे आयोजन दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात येणार असल्याचे बीड जिल्हा बालरंभूमी परिषदेच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी कळवले



आहे.

या महोत्सवात विशेष मुलांच्या (दिव्यांग) शाळांचा सहभाग असणार आहे आणि दिव्यांग बालकलावंत यांचा सहभाग असणार आहे. दिव्यांग मुलांच्या कला कौशल्याला वाव देण्यासाठी बालरंगभुमी परिषदेने यहाँ के हम सिकंदर कला महोत्सवाच्या माध्यमातून विशेष दिव्यांग कलाकारांना सांस्कृतीक रंगमंच उपलब्ध करुन देणार आहे. १८ वर्षाखालील बाल कलाकारांद्वारे नृत्य, चित्रकला, गायन, वादन यासारख्या कला सादर होणार आहेत. जास्तीत जास्त दिव्यांग शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवावा. या महोत्सवाचे स्वरुप स्पर्धात्मक नसून महोत्सवामध्ये सहभागी सर्व शाळांना तीन हजार रुपये मानधन, सन्मानचिन्ह व सहभागी बालकलावंताना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तुचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजनही करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी कळवले आहे.

# मुलाच्या लग्नाच्या आहेराची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मुलाच्या लग्नामध्ये आहेर न स्विकारता पत्रिकेतच क्युआर कोड देऊन त्याद्वारे रोख स्वरुपात जमा झालेला ५५ हजार रुपयांचा आहेर एकबोटे कुटुंबियांनी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून जमा केला. डॉ. अभय व सौ. नंदा या एकबोटे दाम्पत्याने आज मदतीचा धनादेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या कडे सुपूर्द केला. अतिवृष्टीमुळे अरिष्ट्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाथी समाजातील सर्व घटक हे मुख्यमंत्री सहायता निधीत आपले योगदान देत आहेत. डॉ. अभय एकबोटे यांच्या मुलाचे डॉ. कौशिकचे लग्न डॉ. रेया




यांच्याशी शुक्रवार दि.५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले. शेतकऱ्यांसाठी मदत देण्यासाठी पत्रिकेतच क्यु आर कोड प्रसिद्ध करण्यात आला. त्याप्रमाणे आप्तेष्टांनी आपली मदत दिली. ती तब्बल ५० हजार रुपये इतकी झाली. त्यात एकबोटे कुटुंबियांनी स्वतःचे ५ हजार रुपये असे ५५ हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी स्वामी यांच्या सूपूर्द केला. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते हे यावेळी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन

**धाराशिव । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांपैकी ज्यांचे वडील हयात नाहीत,पती हयात नाहीत किंवा ज्यांचा घटस्फोट झालेला आहे,अशा सर्व पात्र महिलांनी स्वतःचे ई-केवायसी करणे आवश्यक आहे. ई-केवायसीनंतर पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश यांची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविकेकडे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत जमा करावयाची आहे.

ही प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने करावयाची आहे. तसेच,या योजनेच्या https://ladakibahin.maharashtra.gov.in या वेब पोर्टलवरील ई-केवायसी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने अंतिम करणे आवश्यक असल्यामुळे पोर्टलवर आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.त्यानुषंगाने जिल्ह्यातील पात्र लाभार्थी महिलांनी सदर वेब पोर्टलवर भेट देऊन ई-केवायसी प्रक्रिया ऑनलाईन पूर्ण करावी.


ज्या पात्र लाभार्थी महिलांनी पूर्वी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे आणि पर्याय निवडताना काही चुका झाल्या आहेत,अशा लाभार्थ्यांसाठी एक अंतिम संधी (One Time Edit Option) उपलब्ध करून देण्यात आली आहे.ही संधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच उपलब्ध राहणार आहे.

# जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सर्व योजना मंडळाकडून नि:शुल्क आहेत. त्यासाठी कामगारांनी कोणत्याही प्रकारे आर्थिक व्यवहार करू नये. जर कोणतीही व्यक्ती आपणास याबाबत पैशाची मागणी करत असल्यास आपल्या जवळच्या लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो कार्यालयाशी किंवा जालना येथील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयात तक्रार नोंदवावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ हे सन २०१२ पासुन कार्यरत आहे. मंडळाचे कामकाज दि.



१ जुलै २०२० पासून संपूर्ण हे संगणीकृत झालेले असून इमारत व बांधकाम क्षेत्रातील कामगारांची ऑनलाईन प्रणाली द्वारे नोंदणी, नूतनीकरण करण्यात येते. बांधकाम कामगारांची विविध माध्यमातून फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी जालना जिल्ह्यातील सर्व नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांनी कळविण्यात येते कि या कार्यालयाकडून कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीची, बोगस संघटना, दलाल, एजंटाची नेमणूक करण्यात येत नाही तसेच याचे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालय कोणत्याही प्रकारे समर्थन करीत नाही. विविध माध्यमातून या कार्यालयाच्या नावाने बांधकाम कामगाराची नोंदणी, नूतनीकरण, विविध योजनेचे अर्ज, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच व गृहपयोगी वस्तुसंच इ. घेऊन देतो या नावाखाली स्वयंघोषित एजंट आणि संघटनांकडून बांधकाम कामगारांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी अशा व्यक्तीपासून कामगारांनी सावधानता बाळगावी, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# आयुर्मंगलम् निवासी मूकबधिर विद्यालयात 81 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## ४३ व्या वाचाल तर वाचाल वाचनालयाचा प्रारंभ..... महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचालचा उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी मिळालेल्या वही पेन दानातून महामानव अभिवादन ग्रुपने आयुर्मगलम् निवासी मूकबधिर विद्यालय बीड येथे ८१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य ( वही पेन) वाटप केले. तर मुलांमध्ये वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचन संस्कृती वाढवण्याकरिता प्रयत्न करत असलेल्या वाचाल तर वाचाल ह्या फिरते मोफत वाचनालयाच्या ४३ व्या केंद्राचा १०० पुस्तकांचा संच देऊन प्रारंभ करण्यात आला. वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस प्राप्त सुहास पालीमकर यांनी सुहास्य नगरीचे रेषा संदेश या पुस्तकांच्या ६ प्रती भेट दिल्या त्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निवासी मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक अलोक कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष



डी.जी. वानखेडे, व समता सैनिक दलाचे मेजर तथा कॅप्टन राजाभाऊ आठवले लाभले होते. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, डी.एम. राऊत, व के. एस.वाघमारे यांची विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के.एस.भुजबळ यांनी केले. तर प्रास्ताविक जी.एम.भोले यांनी केले. सर्वप्रथम स्वामी विवेकानंद, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून दिप प्रज्वलीत करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी भारतीय घटनेच्या प्रस्ताविकाचे वाचन घेतले. आपल्या प्रास्ताविकात जी.एम.भोले यांनी महामानव अभिवादन ग्रुप करत असलेल्या कार्याबद्दल सविस्तर माहिती देऊन सांगितले की दररोज सकाळी ९ वाजता बीड शहरातील दर्शनी भागात असलेल्या ९ पुतळ्यांना पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात येते. ते कार्य म्हणजे त्यांचे दैवतिकरण नसून त्यांच्या महान कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो,लहानपणी शिक्षण घेताना आपल्याला आलेल्या अनेक अडचणीस कसे तोंड द्यावे लागले,हे जाणून इंग्रजी माध्यमांच्या शाळेमुळे शिक्षण खूप महाग झाले आहे. गोरगरिबांचे,मजूर वस्तीतील मुले

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे चंद्रकांत पि. बाबासाहेब भोसले वय - ५१ वर्षे, धंदा-शेती, रा. ईट ता. जि.बीड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहिर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येतो की, मौजे गंगनाथवाडी ता.जि. बीड येथील गट नं. ११३ मधील ०.४० आर जमीन जिची चतु:सिमा पुर्वेस विष्णु मारुती माने यांची जमीन, पश्चिमेस आनंत बाबासाहेब भोसले यांची जमीन, दक्षिणेस शिवाजी शामराव भोसले यांची जमीन, उत्तरेस

रस्ता हि जमीन नितीन पि. हरिभाऊ सवासे, वय-४१ वर्षे, धंदा शेती, रा. रामनगर ता. जि. बीड यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार करुन ठरावाची पुर्ण रक्कम दिलेली आहे. परंतु नितीन हरिभाऊ सवासे हे आमचे पक्षकार चंदक्रांत बाबासाहेब भोसले यांचे हक्कात खरेदीखत करुन देण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे आमचे पक्षकाराने नितीन हरिभाऊ सवासे यांचे विरुध्द मालकी हक्क व निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठीचा दिवाणी दावा क्र. ८३४/२०२५ हा बीड येथील मा. दिवाणी न्यायालयात दाखल केलेला असुन तो प्रलंबीत आहे. त्यामुळे वरील जमीनीबाबत नितीन पि. हरिभाऊ सवासे यांचे सोबत कोणीही खरेदी विक्री, कर्ज बोजा, भाडेपट्टा अथवा अन्य हस्तांतरणाबतचा व्यवहार करु नये, केल्यास चालु दाव्यात बेकायदेशीर खरेदीदारांना परिणाम भोगावे लागतील, याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.
ठिकाण : बीड
दिनांक : ११/१२/२०२५

जाहीर प्रगटन देणार
चंद्रकांत पि. बाबासाहेब भोसले
रा. ईंट ता. जि. बीड
मो.नं.

शिक्का

मार्फत,
ॲड. एस.बी.नांदे,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं. ९९२२३३४४४७

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### रब्बी हंगाम ईपीक पाहणीचे काम वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

रब्बी हंगाम २०२५-२६ करिता ई-पीक पाहणी (Digital Crop Survey DCS) मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी सुरु झाल्याबाबत व पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, AgriStack संकल्पनेअंतर्गत हंगामी पिकांचा माहिती संच, ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे (ऊड) मोबाईल ॲपद्वारे दिनांक १० डिसेंबर २०२५ पासून पीक नोंदणी सुरु करण्यात आली आहे. रब्बी हंगाम २०२५-२०२६ ई-पीक पाहणी पूर्ण करण्याकरिता पुढील कालावधी निश्चित करण्यात आला आहे. शेतकरी स्तरावरील कालवधी १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६,सहायक स्तरावरील कालावधी, दि. २५जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ करीता प्रकरणात रब्बी हंगाम २०२५-२६ ची ई पिक पाहणी पूर्ण करण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत. आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी यांना तातडीने निर्देश द्यावेत की, शेतकरी आणि सहायक यांच्याकडून वरील निश्चित केलेल्या मुदतीत १०० टक्के पीक पाहणी पूर्ण करण्यात यावी.पीक पाहणीमध्ये काही दुरुस्त्या असल्यास, मंडळ अधिकारी यांनी मोबाईल ॲप लॉगिनद्वारे सदर दुरुस्त्या वरील निश्चित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे गरजेचे आहे. आपल्या स्तरावर वेळोवेळी चखड द्वारे आढावा घ्यावा आणि कमी काम असलेल्या तालुक्यामध्ये मोहीम स्वरुपात काम पूर्ण करण्याकरिता नियोजन करावे, या निर्देशांचे तात्काळ व प्रभावी अंमलबजावणी करुन रब्बी हंगाम २०२५-२६ करिता ई-पीक पाहणीचे काम वेळेत पूर्ण करावेत,असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### सांची बुद्ध विहार येथे सुर्यपुत्रास जयंती दिनी अभिवादन



**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतिन भारतीय बौद्ध महासभेचे दुसरे राष्ट्रीय अध्यक्ष,चैत्यभूमीचे शिल्पकार ,सुर्यपुत्र यशवंत उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंती दिनी सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेच्या महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे या होत्या तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, जिल्हा संघटक बी सी डोंगरे, माजी जिल्हा उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,शिवाजी मोरे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका कोषाध्यक्ष डी एस साळवे ,तालुका संस्कार उपाध्यक्ष गुलाबराव धाईजे,कलावतीताई मोरे, भगवान डोंगरे, मोहन काकडे, संभाजी धाईजे हे उपस्तीत होते तसेच या कार्यक्रमाच सुत्रसंचलन महिला तालुका सरचिटणीस कोमलताई डोंगरे,यांनी केले तर आभार महिला तालुका कोषाध्यक्षा अनुराधा ताई साळवे यांनी मानले.

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय



**माजलगाव । प्रतिनिधी**

टेनिसव्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशन यांच्यावतीने अक्कलकोट येथे घेण्यात आलेल्या २७ व्या मिनी व युथ राज्यस्तरीय टेनिसव्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा टेनिसव्हॉलीबॉल चा संघ युथ गटामधून राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये द्वितीय आला आहे. सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघामध्ये कर्णधार वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, प्रियंका जाधव, गौरी गायकवाड या विद्यार्थिनींचा समावेश होता. या खेळाडूंचा पहिला सामना अहमदनगर जिल्हा सोबत होऊन सरळ दोन सेट मध्ये विजय मिळवला, दुसरा सामना लातूर जिल्ह्याशी झाला , लातूरच्या संघास सहज पराभूत करून, फायनल चा अंतिम सामना सांगली विरुद्ध बीड असा झाला, अंतिम सामन्यांमध्ये अटीतटीच्या लढतीमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. या संघामधील उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्यामुळे, २४ ते २७ डिसेंबर झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, यांची निवड झाली आहे, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या या दोन खेळाडू झारखंड येथे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. टाक सर. प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा.आय. एस. पठाण, एकनाथ मस्के,बनसोडे सर, गोकुळ शिंदे,बेदरेआदींनी अभिनंदन केले .

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा दणका

## उपोषणाचा इशारा देताच सार्वजनिक बांधकाम विभाग खडबडून जागा

### गुत्तेदारांकडून नियम व अटी सह दर्जेदार काम करून घेण्याची ग्वाही

### शनिवार रोजीचे आंदोलन स्थगित : शेख खिजर जैनोदीन

**तलवाडा । प्रतिनिधी**

तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गंगावाडी फाटा या दरम्यान रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे या मागणी साठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोद्दीन यांच्यासह पदाधिकारी यांनी रास्ता रोको आंदोलनाचा चा इशारा देताच रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात आले असून शासनाच्या नियम व अटी नुसार दर्जेदार काम करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले असल्याने शनिवारी होणारे रस्ता रोको आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गंगावाडी फाटा या ठिकाणचा रस्ता अत्यंत खराब झालेला असल्याने याठिकाणहून वाहतूक करतांना



वाहन धारकांना तारेवरची कसरत करावी लागत होती,हा रस्ता क्र.२७ मागील दोन वर्षापासून मंजूर करण्यात आला होता परंतु काम सुरू करण्यात आले नसल्याने हे तत्काळ सुरू करण्यात यावे यासाठी युवा दर्पण,दैनिक लोकाशा मध्ये वृत प्रकाशित करून आवाज उठवण्यात आला होता यानंतर काम सुरू करण्यात आले होते परंतु सुरू झालेले काम ही संबंधित गुत्तेदाराने बंद केले होते त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने, बाळू डहाळे, सुनिता भाभी गिल व सहकार्याने या रस्त्याचे काम तात्काळ करण्यासाठी शनिवार रोजी रास्ता रोको करण्यात येईल असा इशारा दिला होता.याची धास्ती घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## वडवणीकरांचे रेल्वेचे स्वप्न पूर्णत्वाकडे

### बीडपासून हायस्पीड चाचणी यशस्वी, नागरिकांकडून जल्लोषात स्वागत

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड-अहिल्यानगर रेल्वे मार्गावरील बीड ते वडवणी टप्प्यावर गुरुवारी (ता. ११) हायस्पीड रेल्वे चाचणी यशस्वी झाली. रेल्वे प्रतितास १३२ किलोमिटर वेगाने धावली. आता वडवणी टप्प्यातील प्रवाशांचे रेल्वेत बसण्याचे स्वप्न पूर्णात्वाच्या दिशेने आहे. बीड ते वडवणी मार्गावर गेल्या रविवावीर रेल्वे इंजिन धावले. लोहमार्गाची चाचणी झाल्यानंतर आज आठ डब्यांची रेल्वे धावली. दरम्यान,



अहिल्यानगर -बीड टप्पा पुर्ण झाला असून गेल्या काही दिवसांपासून सहा डब्यांची डेमू रेल्वे धावत आहे. बीड-अहिल्यानगर प्रवास करणाऱ्यांची संख्या दोनशे आहे. ही रेल्वे सध्या डिझेलवर चालत असून १६ स्थानके आहेत. अहिल्यानगरहून सुटलेली गाडी नारायणडोह, लोणी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, आष्टी, अमळनेर (भांड्याचे), रायमोह, एगनवाडी, जाटनांदूर, राजुरीमार्गे बीड येथे येते. काहीच दिवसांत ही रेल्वे विजेवर धावणार असून त्यादृष्टीने कामे सुरु आहेत.

रेल्वे फुलांनी सजवली- रेल्वे पाहाण्यासाठी सकाळपासूनच वडवणी स्थानकावर प्रवाशांनी गर्दी केली. बीड येथून सकाळी ८ : ४६ ला निघालेली रेल्वे (थउ्ल ४ऊ ४०३१६) ▶▶ उर्वरित पान २ वर

## लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर: गणेश लांडे, जिल्हा सरचिटणीस

**बीड । प्रतिनिधी**



लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता भाजपा बीड जिल्हा कार्यालय, माने कॉम्प्लेक्स येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. मुंडे साहेबांनी आपल्या संपूर्ण कार्यकाळात सामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी अथक परिश्रम घेतले. शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांसाठी काम करताना त्यांनी लोकसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्याची परंपरा आजही अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा देत असून, समाजातील समस्यांकडे संवेदनशील दृष्टीकोन ठेवण्याची शिकवण त्यांच्या कार्यातून मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेले रक्तदान शिबिर हे त्यांच्या लोकसेवेच्या विचारांना अभिवादन करणारे ▶▶ उर्वरित पान २ वर

## ऊसाला विनाकपात पहिली उचल तीन हजार रुपये द्या

### अन्यथा २५ डिसेंबर पासून कारखान्याचे गाळप , ऊसतोडणी, वाहतूक बंद करू- ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती ,बीड



**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड व धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या पारगाव येथील भीमाशंकर शुगर साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येत भीमाशंकर कारखाना प्रशासनास ऊस दर जाहीर करण्याचे लेखी निवेदन दिले. निवेदनात यावर्षी गाळप होणाऱ्या ऊसाला विनाकपात पहिली उचल ३०००/-रुपये व अंतिम दर ४०००/-रुपये देण्यात यावा तसेच ऊस गाळपा नंतर १४ दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यावर बिल जमा करण्यात यावे. आदी.. प्रमुख मागण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने गुरुवारी दि.११डिसेंबर रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड ,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## कड्याच्या बंधाऱ्याकडे कोणी लक्ष देणार का ?

### तीन महिन्यांपासून बंधाऱ्यावरची वाट चालू केली नाही

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या दुरूस्तीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे.कारण कडि नदीला १५ सप्टेंबर रोजी महापूर आला होता आणि या बंधाऱ्याचे दरवाजे जास्त प्रमाणात बंद ठेवल्याने या बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या बंधाऱ्यांकडे कायमच संबंधित कार्यालय,अधिकारी यांचे दुर्लक्ष राहीले आहे. याआधी हि मोठ्या प्रमाणात दरवाज्यातून पाणी गळती होत होती. संबंधितांना लेखी तक्रार केली होती तसेच वारंवार विनंती केली परंतु आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत. फक्त



एकवेळ तात्पुरते पाणी गळती थांबविण्यासाठी थातुरमातुर काम संबंधित अधिकाऱ्यांनी करून दिले होते. त्यानंतर आजपर्यंत कसलीच कामे किंवा कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत. नदिला महापूर येऊन बंधाऱ्याची तुटफुट होऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री नाथांच्या नगरात भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांचा सत्कार मोठ्या उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैभव असलेले व महाराष्ट्रातील श्री साधू संतांचे माहेर घर असलेले श्री प्रतिष्ठान नगर अर्थातच श्री दक्षिण श्री काशी क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे असे श्री पवित्र श्री क्षेत्र पैठण या ठिकाणी २७ महा कुंडी महायज्ञाचे आयोजन श्री हरिभक्त परायण श्री वेदशास्त्र संपन्न व श्री शांती ब्रह्म श्री एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज श्री योगीराज महाराज गोसावी यांच्या कुशल उत्तम अप्रतिम नियोजनातून व श्री योगीराज महाराज यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली त्यांच्या माध्यमातून या ठिकाणी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे या यज्ञासाठी श्रीक्षेत्र वाराणसी अर्थातच श्री क्षेत्र भगवान श्री विश्वनाथाचे ठिकाण असलेल्या



श्री काशी क्षेत्रातील वेदमूर्ती ब्रह्म वृंदांच्या पवित्र वेद मंत्राच्या जयघोषात २७ महा कुंडी महायज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह ९ डिसेंबर ते १४ डिसेंबर या दरम्यान श्रीक्षेत्र पैठण येथे संपन्न होत आहे तसेच या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमांमध्ये सप्ताह मध्ये होत असलेले कार्यक्रम श्री विष्णुसहस्त्रनाम व हरिपाठ भजन गवळणी श्री शांती ब्रम्ह एकनाथ महाराज यांचे भारुड तसेच हरी किर्तन हे देखील नामांकित महाराष्ट्रातील कीर्तनकार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा धार्मिक सोहळा मोठ्या थाटामाटा मध्ये श्री क्षेत्र पैठण येथे संपन्न होत आहे याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र मध्ये नामांकित असलेल्या महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेशचे प्रदेश उपाध्यक्ष तथा देव देश धर्म यासाठी सातत्याने आपले ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यातील हंगामी वसतिगृहात उसतोड कामगारांच्या 22 हजार मुलांना मिळतेय शिक्षण

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बीड, गेवराई, अंबाजोगाई, परळी तालुक्यात प्रत्येकी एक तर माजलगावात ३ अशा सात साखर कारखान्यांचा गळीत हंगाम नोव्हेंबरपासून सुरु झाला आहे. हजारो मजूर कुटुंबासह ऊस तोडणीला फडावर जातात. बीड जिल्ह्यातील



जवळपास सहा लाख मजूर ऊसतोडणीला जातात. जिल्ह्यात रोजगाराचे इतर स्त्रोत नसल्याने मजुरांना साखर कारखान्यांच्या गाळप हंगामात रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. राज्यात अशा ऊस तोडणी मजुरांच्या मुलांसाठीच्या साखर शाळा सुरू नाहीत. परंतु बीड जिल्ह्यात समग्र शिक्षा अभियानांतर्गत हंगामी वसतिगृहांच्या सुविधेमुळे ऊसतोडणी मजुरांच्या जवळपास २२ हजार मुलांचे स्थलांतर थांबून ते शिक्षणाच्या प्रवाहात आहेत. सध्या सुरू असलेल्या वसतिगृहांमुळे या मुलांच्या जेवणाची सोय झाली आहे.

जिल्ह्यात ऊसतोडणीला येणाऱ्या मजुरांच्या पाल्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय साखर कारखान्यांकडून परिसरातील शाळांमध्ये करण्यात येते. परजिल्ह्यातून येणाऱ्या मजुरांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकाही ठिकाणी साखरशाळा नाही. स्वयंसेवी, खासगी संस्थांचा पुढाकार ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी सुरुवातीला काही स्वयंसेवी संस्था व खासगी संस्थांच्या पुढाकारातून सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात साखरशाळा सुरु केल्या होत्या. सद्यस्थितीत अनेक पालक पाल्यांना सोबत नेतात. त्यामुळे आई वडिलांसोबत मुलेही उसाच्या फडातच दिसतात. परंतु हे प्रमाण मागील काही वर्षांपासून रोखण्यात यश आले आहे. हंगामी वसतिगृहांमुळे जिल्ह्यातील ऊसतोडणी मजुरांची मुले शिक्षणाच्या प्रवाहात टिकून आहेत.